# देववाणी संस्कृतची वैशिष्ट्ये अन् संस्कृतला वाचवण्यासाठीचे उपाय

## अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे '*' या चिन्हाने दर्शवली आहेत.)


**-मनोगत** ६

**-ग्रंथाविषयी सूक्ष्म-जगतातील 'एक विद्वान' यांनी केलेले भाष्य** ७

**-'सूक्ष्म' या शब्दाच्या संदर्भातील काही संज्ञांचा अर्थ** ८

**-ज्ञान-प्राप्तकर्त्या साधकांचा परिचय** ९

**-कृतज्ञता** १०

**१. संस्कृत भाषेची निर्मिती** ११

* संस्कृत ही ईश्वरनिर्मित भाषा असणे ११
* द्वापरयुगापर्यंत संस्कृत हीच विश्वाची भाषा होती ! १२

**२. संस्कृत भाषेची वैशिष्ट्ये** १३

* संस्कृत भाषेची व्याकरणदृष्ट्या असलेली शास्त्रीयता जगातील कोणत्याच भाषेत नसणे १३
* उच्चारशास्त्रामुळे सहदाावधी वर्षे वेदमंत्रांचे उच्चार तसेच असणे २०
* कधीही भ्रष्ट न होणारी संस्कृत भाषा ! २२
* संस्कृत वाक्यातील शब्द मागेपुढे केले, तरी अर्थ न पालटणे २७
* संस्कृत श्लोकातील एक अक्षर जरी गाळले, तरी श्लोकाचा अर्थ पालटला जाऊन विरुद्ध अर्थ होऊ शकणे २७
* संस्कृत ही सर्व भाषांमध्ये दिव्य, प्रमुख अन् मधुर भाषा ! २९

**३. संस्कृत भाषेचे महत्त्व** ५२

* संस्कृत ग्रंथ म्हणजे भारतीयत्व आणि हिंदुत्व ! ५२
* संस्कृतच्या नेतृत्वाखाली भारतीय भाषांनी राष्ट्रीय एकात्मता घट्ट

आणि वर्धिष्णू केली ! ५२
* जगातील सर्व भाषा संस्कृतोद्‌भव असल्यामुळे एखादी भाषा शिकतांना संस्कृतचा आधार घेतल्यास ती शिकणे अधिक सोपे ! ५२
* जेथे संस्कृतचे अध्ययन होते, तेथे संस्कृती वास करते ५२
* 'अमेरिकन चोरां'विरुद्धचा हळदीच्या 'पेटंट'संबंधीचा लढा संस्कृतमुळेच जिंकता आला ! ५४
* संगणकालाही शुद्ध वर्णमाला अपरिहार्य असल्याने संस्कृत (देवनागरी) लिपीचा वापर सोयीचा होणे ५५
**४. संस्कृत भाषेचे लाभ** **५५**
* संस्कृत बोलणाऱ्यांना मेंदूचे रोग होत नसणे ५५
* संस्कृतमुळे मानसिक क्षमता वाढणे आणि वाणीशुद्धी होणे ५५
**५. संस्कृत भाषेला होणारे विविध प्रकारचे विरोध** **५६**
* मुसलमान आणि इंग्रज यांनी संस्कृतच्या विनाशाला आरंभ करणे ५६
* संस्कृत ही अन्य युरोपियन भाषांप्रमाणेच एक असल्याचे सांगणारे अहंगंड पाश्चात्त्य ! ५६
* संस्कृतचा दुःस्वास ब्राह्मणद्वेषापोटी ६१
**६. संस्कृत भाषेची सद्यस्थिती** **६३**
* शिक्षण खात्याने केलेली संस्कृतची गळचेपी ६५
* कुठे संस्कृतचे महत्त्व जाणून त्याचा लाभ करून घेणारे विदेशी, तर कुठे भारतातील संस्कृतद्वेष्टे राज्यकर्ते ६८
**७. संस्कृत वाचवण्यासाठीचे उपाय आणि संस्कृतची उपासना** **७२**
* साधना वा धार्मिक कृती यांसंदर्भात देवभाषा संस्कृतचा वापर करणे आवश्यक असणे ७४
* संस्कृत भाषा मृत आहे, असे म्हणणे हा शुद्ध मूर्खपणा आहे ! ८०
* संस्कृत भाषेतील धनाकर्ष नाकारणाऱ्या आंध्र अधिकोशास (बँकेस) ग्राहक मंचाची चपराक ! ८३
**८. संस्कृतच्या संदर्भात भारतातील साधकांना आलेल्या अनुभूती** **८५**
**९. संस्कृतच्या संदर्भात विदेशातील साधकांना आलेल्या अनुभूती** **९२**
**१०. अनुभूतींचे विवरण** **९५**

# मनोगत

ज्या देववाणी संस्कृतने मानवाला ईश्वरप्राप्तीचा मार्ग दाखवला, त्या देववाणीलाच कृतघ्न मानव, विशेषतः स्वातंत्र्योत्तर काळातील भारतातील सर्वपक्षीय राज्यकर्ते नष्ट करायला सरसावले आहेत. सामान्य जनतेला याचे गांभीर्यच कळत नाही. ते कळावे म्हणून या ग्रंथात देववाणीची वैशिष्ट्ये आणि महत्त्व दिले आहे. एकदा का जनतेला देववाणीची वैशिष्ट्ये अन् महत्त्व कळले की, देववाणीची केविलवाणी सद्यस्थिती पाहून वाईट वाटेल आणि क्रोधही येईल. नंतर जेव्हा त्या स्थितीच्या कारणांचा शोध जनता घेऊ लागेल, तेव्हा देववाणीला विरोध करणारे सर्वपक्षीय राज्यकर्तेच तिच्या दयनीय स्थितीला कारणीभूत आहेत, हे लक्षात येईल आणि जनता भाषाक्रांतीसाठी सिद्ध होईल. या भाषाक्रांतीसाठी आवश्यक असलेले, म्हणजेच देववाणी संस्कृतला वाचवण्यासाठीचे उपाय जनतेला ज्ञात असणे आवश्यक आहे. या सर्व गोष्टींचे विवेचन या ग्रंथात दिली आहे. तसेच मराठी भाषेविषयी सर्वसाधारण ज्ञान, तिला वाचवण्यासाठीचे उपाय इत्यादींविषयीची विवेचन मराठी भाषाविषयक चार ग्रंथांत दिली आहे. या ग्रंथांचा थोडक्यात परिचय ग्रंथाच्या शेवटी दिला आहे.

अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी ईश्वराने दिलेला संस्कृत भाषेचा ठेवा करंटेपणा करून आपण नष्ट केला, असे उद्याची पिढी म्हणू नये, यासाठी व्यापक स्तरावर संस्कृतचा समाजात प्रसार करणे, हे प्रत्येकाला आद्यकर्तव्यच वाटायला हवे.

मानवाला मोक्षप्राप्तीची वाट दाखवणारी संस्कृत भाषा लयाला जावी, यासाठी इंग्रजीसारखी आसुरी आणि अन्य अभारतीय भाषा निर्माण झाल्या. त्या कोणी निर्माण केल्या, तसेच त्यांचा आसुरी प्रभाव संपवण्यासाठी काय करावे लागेल, यासंदर्भातील विवरण ‘संस्कृतचा दैवी इतिहास, तिच्यावरील आसुरी हल्ले अन् तिचे पुनरुत्थान’ या निराळ्या ग्रंथात वाचावयास मिळेल.

हा ग्रंथ वाचून मानवाला, विशेषतः हिंदूंना देववाणीचे महत्त्व कळून त्यांना निदान स्वतःच्या ल ाभासाठी तरी तिच्या पुनरुत्थानासाठी प्रयत्न करण्याची बुद्धी होवो, ही श्रीगुरुचरणी प्रार्थना !

**– संकलक**